# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - संगीत रस सुरस मम जीवनाधार
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ वंदना दिलीप भट

आकाशाला व्यापून उरतो
ध्वनी ओंकाराचा
मूळ स्वर तो अनादी अनंत
असे संगीताचा।।

अविरत वाहे सुरेल संगीत
निसर्गासदनी
झुळझुळणारे शीतल वारे
निर्झर गातो गाणी।।

पक्षांची सुमधूर किलबिल
साद कोकीळेची
नदी वाहते शांत प्रवाही
गाज समुद्राची।।

सळसळ करीती पाने
झुलविती सुमनांना
सुरंगी ती फुले सुगंधी
तोषवी नयनांना।।

सप्तसुरांची उधळण होई
रम्य सरोवरात
कुणा रमणीची ओवी
रूजे मनामनात।।

Anahat Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

बालपणीची बडबडगीते
हसवी लेकरांना
उंदीरमामा चिऊकाऊच्या
गोष्टी ऐकताना।।

आई गाते सुस्वर अंगाई
बाळाला जोजवी
आजीच्या मुखातील मंत्र
स्तोत्रे वाटे हवी हवी।।

यौवनातले लाघवी प्रेम ते
उधळी धुंद तराणे
मधुमधूर भावना प्रीतीच्या
नयनी सखी पाहणे।।

मिळता नजरा जुळती
अक्षर नाती
अबोलीचे रंग रेशमी
जीवनास उजळती।।

नादमधूर की प्रणयगीते
सख्यासाजणीसाठी
जन्मोजन्मी मिलनाची
शपथ वाहताती।।

प्रौढपणीची प्रीती वेगळी
रूजते हृदयांतरी
तोच चंद्रमा,तिच प्रियाही
उमजे नव्यापरी।।

भाळण्यातून सांभाळणे
एकमेकांना असे
भलेबुरे विसरून जाऊन
निर्मळ जीणे असे।।

वृध्दत्वी मन दंग असावे

Anahat Music Therapy

# ‘स्वरचित’- काव्य स्पर्धा

ईश्वर नामस्मरणी
सोबतीला सतत असावी
ज्ञानेशाची अभंगवाणी

सातसुरांनी सजते मैफल
अमृताची धणी
गीत येतसे अलगद कानी
वाटे संजीवनी।।

कवितेची अनंत रूपे येती
होऊन गाणी
तालावर डोलती हृदये
अक्षर अमोल लेणी।।

शब्द तालसूर एकच होता
संगीत जन्मा येते
नादब्रह्म हे परमेशाचे रुप
सरूप होते।।

आराधना ही जगदिशाची
संगीत थोर कला
विश्वनाट्य सूत्रधाराची
शोभे जी चित्कला।।

स्वानंदाचे निधान हे खरे
रसिकांना रिझविते
दु:ख हरते,शांतवते मन
आनंदाचे भरते।।

सूरसूर मम बहरत राहो
जीवनाच्या अंगणी
दान दिले तू गोड गळ्याचे
प्रणाम देवाचरणी।।

Anahat Music Therapy